# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### कोल्हापूर शहरातील सी.पी.आर. रूग्णालयातील व्हेंटिलेटर नादुरूस्त असल्याबाबत

**(१) ९२२४ (१५-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील सी.पी.आर. हे शासकीय रूग्णालय प्रशासनाने पूर्ण वेळ कोरोना रूग्णालय म्हणून जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सी.पी.आर. रूग्णालयाकडे १०१ व्हेंटिलेटर असून त्यातील ४० व्हेंटिलेटर नादुरूस्त असल्याने बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर व्हेंटिलेटर दुरूस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे

(२) व (३) संस्थेत सद्य:स्थितीत १५९ व्हेन्टीलेटर उपलब्ध असून त्यापैकी २२ व्हेन्टीलेटरचे सुट्टे भाग उपलब्ध नसल्याने व व्हेन्टीलेटरचा दुरुस्ती खर्च यंत्राच्या घसारा किंमतीपेक्षा जास्त असल्याने दुरुस्त होऊ शकत नसल्याने बंद आहे.

तथापि, त्यामुळे रुग्णोपचारार्थ कोणतेही अडथळे न येता रुग्णसेवा सुस्थितीत सुरु आहे.

(४) लागू नाही

---

### राज्यातील घोषित केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांना अनुदान मंजूर करणेबाबत

**(२) १३७२२ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १२५०४ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घोषित केलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांना अनुदान मंजूर करणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही न केल्याचे माहे मे, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील शाळा/तुकड्यांना अनुदान मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-१०-२०२५) :** (१) व (२) राज्य शासनाच्या मुल्यांकनाच्या सुधारीत निकषांनुसार पात्र होणाऱ्या शाळा व तुकड्यांना राज्य शासनाद्वारे वेळोवेळी शासन निर्णय दिनांक १२/०२/२०२१. दिनांक १५/०२/२०२१, दिनांक २४/०२/२०२१ व दिनांक ०६/०२/२०२३ द्वारे वेतन अनुदानाचा टप्पा अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच अशा शाळांना शासन निर्णय दिनांक २५/०८/२०२५ अन्वये पुढील टप्पा अनुज्ञेय आहे. टप्पा अनुदानाबाबत राज्य शासनाच्या धोरणानुसार पूर्वलक्षी प्रभावाने अनुदान अनुज्ञेय नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा न बंद करण्याबाबत

**(३) १४६३६ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ज्या शाळांची पटसंख्या १० पेक्षा कमी आहे अशा शाळा बंद करण्याचा शासनाचा विचार असल्याचे दिनांक ४/५/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी क्षेत्र डोंगराळ व दुर्गम भागातील मुलांना विविध अडचणी येत असल्याने मुले शाळेत जात नसल्यामुळे या भागातील पट संख्या कमी अधिक होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अशा क्षेत्रातील कमी पट संख्या असलेल्या शाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-१०-२०२५) :** (१) १० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा कोणताही निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला नाही.तसेच यासंदर्भात कोणतीही शासन अधिसूचना/ शासन निर्णय/ शासन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही.
(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींनुसार राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांनी इ.१ ली ते इ.५ वी मध्ये शिकणाऱ्या बालकांसाठी वस्ती नजिकच्या १ कि.मी. अंतराच्या आत व ६ ते ११ वर्ष वयोगटातील किमान २० बालके उपलब्ध असेल तिथे शाळा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच याप्रमाणे शाळा उपलब्ध नसल्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन, निवास सुविधा व अन्य सुविधा यांची पुरेशी व्यवस्था करीत. सबब, राज्यातील ग्रामीण, वंचित तथा दुर्गम भागातील मुला-मुलींचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

तसेच शासन निर्णय दिनांक १५/११/२०११ अन्वये शाळांना अनुदानासाठी पात्र करण्याकरीता मुल्यांकनाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार डोंगराळ व दुर्गम भागातील शेवटच्या वर्गातील पटसंख्या ३० ऐवजी २० अशी करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरणे बाबत

**(४) १५३३६ (२८-१२-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील २० गावातील पोलीस पाटलाची पदे मागील १० वर्षांपासून रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावपातळीवर शांतात प्रस्थापित करण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी व इतर कामात सुव्यवस्था आणण्यासाठी गावातील पोलीस पाटील हे महत्वाची भुमिका बजावत असतात हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सराई, येसगांव, खिर्डी, चिंचोली, मलकापूर, लोणी अशा मोठ्या गावातील पोलीस पाटील पदे रिक्त असून लगतच्या गावातील पोलीस पाटील यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला असल्याने कार्यरत पोलीस पाटील यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील गावोगावचे पोलीस पाटील मानधन वाढीपासून वंचित असल्याने आर्थिक अडचणीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त असलेली पोलीस पाटील यांची पदे भरणेसाठी तसेच पोलीस पाटीलांचे मानधन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) सराई व येसगांव येथील पोलीस पाटील पदाबाबतची प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने, खिर्डी व चिंचोली येथे पोलीस पाटील भरती प्रक्रियेत पात्र उमेदवार न मिळाल्याने आणि लोणी व मलकापूर येथील पोलीस पाटील हे विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने सदर ठिकाणची पदे रिक्त असून सदर गावातील नागरिकांची गैरसोय होऊ नये व तेथील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी शेजारील गावच्या पोलीस पाटील यांच्याकडे पोलीस पाटील पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(४) व (५) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये पोलीस पाटील यांचे मानधन रुपये ३,०००/- वरुन रुपये ६,५००/- तसेच दिनांक १५/०३/२०२४ अन्वये पोलीस पाटील यांचे मानधन रुपये ६,५००/- वरुन रुपये १५,०००/- इतके करण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर पोलीस पाटील पदाबाबत बिंदूनामावलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना पाठविला आहे. सदर मान्यतेनंतर उपविभागीय स्तरावर पोलीस पाटील भरतीबाबत बिंदूनामावली नुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी निर्देशित केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन व प्रवासभत्ते प्रलंबित असलेबाबत

**(५) १५९०० (२८-१२-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील ८४३ पोलीस पाटलांसह राज्यातील २८ हजार पोलीस पाटलांना गेल्या दोन महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस पाटलांना गावातून पोलीस ठाणे किंवा पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत जाण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येतो तोही गेल्या तीन वर्षापासून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस पाटलांना वेळेत मानधन व प्रवासभत्ते मिळण्यात कोणत्या अडचणी येत आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस पाटलांना वेळेत मानधन व प्रवासभत्ता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील पोलीस पाटील यांना त्या त्या महिन्यात माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंतचे मानधन देण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

राज्य शासनाकडून पोलीस पाटील यांचे मानधन तीन महिन्यांतून एकदाच मानधन अदा करण्याचे धोरण असताना देखील पोलीस पाटील यांना सद्य:स्थितीत दरमहा मानधन अदा करण्यासाठी निधी वितरीत केला जातो. तसेच वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यातील घटक कार्यालयांना प्रवासभत्त्याकरीता रुपये ६,२०,३१,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले असून त्यापैकी रुपये ४४,४७,०००/- इतके अनुदान पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांना वितरीत केले आहे.
(३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत घटक कार्यालयांना वेळेवर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
तसेच राज्यातील पोलीस पाटलांना मानधन, प्रवासभत्ता व दैनिक भत्ता वेळेवर अदा करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत दिनांक २७/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये घटक कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या बरखास्त करण्याच्या शिफारशी बाबत

**(६) २०६३३ (०९-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या विरोधात लोकप्रतिनिधीनी मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या असून त्यानुषंगाने मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षेतेखाली समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी ही समिती बरखास्त करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिफारशीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१८-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

मा.महसूल मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली नसल्याचे महसूल विभागाने कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथे प्रादेशिक नेत्र चिकित्सा व संशोधन संस्था सुरु करण्याबाबत

**(७) २१२७३ (०५-०१-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाने (मेडीकल) प्रादेशिक नेत्र चिकित्सा व संशोधन संस्थेसाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सन २०१०-११ साली अकराव्या पंचवार्षिक योजनेत नागपूरमध्ये प्रादेशिक नेत्रचिकित्सा व संशोधन केंद्र तयार करण्याबाबत आश्वासित करुनही १२ वर्षामध्ये अद्यापही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाला मंजूरी देऊन यासाठी निधी उपलब्ध करण्याकरीता शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३१-१०-२०२५) :** (१) (२) व (३) हे खरे नाही, तथापि, याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची बाब संस्थेच्या विचाराधीन आहे.

(४) लागू नाही.

---

## नागपूर मधील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय टाळण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(८) २१३४८ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य संस्था, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय रुग्णालयाला आवश्यक असणारी यंत्रसामुग्री, साधनसामुग्री, उपकरणे, औषधे, सर्जिकल उपकरणे इत्यादी एकत्रित खरेदी करण्याचे अधिकार सन २०१७ पासून हाफकिन महामंडळाकडे होते, परंतु हाफकिनकडे निधी जमा करुनही खरेदी प्रक्रिया होत नसल्यामुळे शासनाने महाराष्ट्र वैद्यकीय प्राधिकरण स्थापण्याचा निर्णय घेतला असून हे प्राधिकरण प्रत्यक्षात कार्यान्वित होईपर्यंत खरेदी विभागासंदर्भातील सर्व अधिकार शासकीय वैद्यकीय आणि संशोधन संचालनालयाच्या आयुक्तांना प्रदान करण्याचा निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानंतर ८ महिन्यांच्या कालावधीमध्ये आतापर्यंत नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामधील रुग्णांची गैरसोय टाळण्याकरीता एकूण किती कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली असून मेडिकल रुग्णालयाला स्थानिक पातळीवर खर्च करण्यासाठी १ टक्क्यावरुन ३० टक्के अधिकार देण्यात आले असल्याने किती रुपयाची औषधी खरेदी करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-११-२०२५) :** (१) होय.

शासकीय औषध व यंत्रसामुग्री खरेदी प्रक्रियेतील विलंब टाळण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.हे प्राधिकरण प्रत्यक्ष कार्यान्वित होईपर्यंत खरेदीसंबंधी सर्व अधिकार शासकीय वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आयुक्तांना प्रदान करण्याचा शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी घेण्यात आला होता.तथापि, सदर शासन निर्णयास दिनांक १५ मार्च २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे. तसेच, सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांची औषधे व यंत्रसामुग्रीची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

(२) नागपुर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी ८ महिन्याच्या कालावधीमध्ये आतापर्यंत रुग्णांची गैरसोय टाळण्याकरीता एकूण रुपये ७,३३,२४,८४५/-रुपयांची खरेदी करण्यात आली. तसेच रुग्णालयाला स्थानिक पातळीवर खर्च करण्यासाठी १० टक्क्यावरुन ३० टक्के अधिकार देण्यात आले असल्याने संस्थास्तरावर रुपये २,००,६२,६७२/- इतक्या रुपयांची औषध खरेदी करण्यात आली आहे.

(३) लागू नाही.

---

## राज्यात रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत

**(९) २१७९५ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महाआक्रोश मोर्चा काढला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाआक्रोश मोर्चाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात शिक्षक व सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना तात्काळ जुनी पेन्शन योजना लागू करणे, दत्तक शाळा योजना, कंत्राटीकरणाचा शासन आदेश, कमी पटसंख्या असलेल्या शाळा एकत्रिकरण करण्याचा शासन आदेश, शिक्षकांकडील सर्व शैक्षणिक कामे, शिक्षकांची मुख्यालयाची अट, एमएससीआयटीची अट रद्द करणे तसेच ऑनलाईन माहितीचा भडीमार तात्काळ थांबविणे, शिक्षकांना पूर्ण वेळ शाळेत थांबवून शिकवायला देणे, शिक्षण विभागाला आवश्यक ते अनुदान तात्काळ देणे, दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या सहाय्यक उपकरणांसाठी आवश्यक अनुदान मंजूर करणे, सर्व प्रकारची पदोन्नती तात्काळ पूर्ण करणे, शिक्षकांकडील पोषण आहाराची जबाबदारी अन्य यंत्रणेकडे देणे, या व अन्य मागण्यां आंदोलकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाआक्रोश मोर्चाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनातील सदर मागण्यां पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शिक्षकांच्या विविध मागण्यांचा वेळोवेळी आढावा घेवून त्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याचा वेळोवेळी प्रयत्न करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मधील नोंदणी देण्याबाबत

**(१०) २२०३७ (१९-०४-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या संघटनांनी सी सी एम पी कोर्स उत्तीर्ण होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी मिळावी तसेच अन्य विविध प्रलंबित मागण्यांबाबत माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करून विविध मागण्यांचे निवेदन शासनाला सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमिओपॅथी डॉक्टरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक आयोजित करण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास

लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-११-२०२५) :** (१)होय
(२) होय
(३) मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असणारी रिट याचिका क्र.७८४६,७८४७/२०१४ मधील दिनांक १४/०३/२०१६ चे अंतरिम आदेश व सदर याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन दिनांक ०५/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला नोंदणी घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार निधी योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळाला नसल्याबाबत

**(११) २२३०७ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत असून त्यांतर्गत विद्यार्थ्यांना दरवर्षी रुपये ६० हजार निर्वाह भत्त्यांपोटी देण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वाधार निधी योजनेंतर्गत निर्वाह भत्त्याची रक्कम पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यात गत तीन वर्षांपासून रक्कम जमा करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तीन वर्षांपासूनची रक्कम थकित ठेवणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच संबंधित रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (३०-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासन निर्णय, दिनांक २६/१२/२०२४ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतर्गत पुढीलप्रमाणे लाभ देण्यात येतो.

| खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगर पालिकेच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेली महाविदयालये/ शैक्षणिक संस्था या ठिकाणी  अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| भोजन भत्ता | रू.३२,०००/- | रू.२८,०००/- | रू.२५,०००/- | रू.२३,०००/- |
| निवास भत्ता | रू.२०,०००/- | रू.१५,०००/- | रू.१२,०००/- | रू.१०,०००/- |
| निर्वाह भत्ता | रू.८,०००/- | रू.८,०००/- | रू.६,०००/- | रू.५,०००/- |
| | रु.६०,०००/- | रु.५१,०००/- | रू.४३,०००/- | रू.३८,०००/- |

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील व मागील वर्षातील पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये एकूण १५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. तसेच पुरवणी मागणीव्दारे रुपये १५० कोटी व पुर्नविनियोजनाव्दारे ७१.६० कोटी याप्रमाणे एकूण ३७१.६० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करून विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकने प्राध्यापकांच्या ९७ जागा कमी केल्याबाबत

**(१२) २२३३२ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आयुष विभागाने राज्यातील शासकीय अनुदानित व विनाअनुदानित आयुर्वेद पदव्युत्तर महाविद्यालयात सन २०२३-२४ या वर्षांसाठी मंजूर केलेल्या १,२११ पदांमधील ९७ पदांवर प्राध्यापक नसल्यामुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकने उक्त जागा कमी केल्या असून यात शासकीय व अनुदानित महाविद्यालयांतील पदांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ९७ पदे कमी करण्याची कारणे काय आहेत व या जागा केव्हांपासून रिक्त आहेत,

(३) असल्यास, या जागांवर पूर्णवेळ प्राध्यापकांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०४-११-२०२५) :** (१), (२) व (३) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची पदे कमी करण्यात आलेली नाहीत. विद्यार्थीहित विचारात घेऊन अध्यापकांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतात. अध्यापकांची काही रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत, काही पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. तर उर्वरित रिक्त पदांच्या अनुषंगाने पदभरती करण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्तरावर सुरू असून सदर पदांवर लवकरच उमेदवार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक शाळांची संच मान्यता ऑफलाईन करण्याबाबत

**(१३) २२९९३ (२२-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १९४०१ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांच्या ऑनलाईन संच मान्यतांमध्ये गेल्या ५- ६ वर्षांपासून मोठ्या प्रमाणात त्रुटी असल्यामुळे अनेक शिक्षक कृत्रिमरित्या अतिरिक्त ठरत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा २० टक्के अनुदानाकरीता पात्र आहेत किंवा अंशत: अनुदानित आहेत अशा शाळेतील शिक्षक चुकीच्या संच मान्यतेमुळे वेतनापासून वंचित राहत आहेत व त्यांना सेवा संरक्षण नसल्यामुळे त्यांची सेवा समाप्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माध्यमिक शाळांच्या संच मान्यता, कनिष्ठ महाविद्यालयाच्या संच मान्यतेप्रमाणे ऑफलाईन करण्याबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही. ऑनलाईन संच मान्यता जनरेट करतांना क्षेत्रियस्तरावरील माहितीचे अद्यावतीकरण न झाल्यामुळे तांत्रिक कारणास्तव संच मान्यता दुरूस्तीसाठी संचालनालय स्तरावर प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार संच मान्यता दुरूस्ती प्रकरणे ऑनलाईन पडताळणी करून विविधस्तरावरील माहिती अद्यावत करून योग्य संच मान्यता संचालनालय स्तरावरुन शिक्षणाधिकारी लॉगिनला पुनश्च: उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील अंशत: अनुदानित रिक्त पदांवर वैयक्तिक मान्यताप्राप्त अंशत: अनुदानित शिक्षकांचे वेतनाच्या समान टप्प्यावर समायोजनाबाबत शासन निर्देश असून त्यानुषंगाने क्षेत्रियस्तरावर कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय शाळांसाठी “दत्तक शाळा योजना” या धोरणास विरोध होत असल्याबाबत

**(१४) २३२७० (२२-०७-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २१२४१ ला दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना' दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी राबविण्याचा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने घेतला असून दानशूर व्यक्ती, स्वयंसेवक संस्था, उद्योग समुह (कॉर्पोरेट) कार्यालय यांच्या सहयोगाने शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभागाने दत्तक शाळा योजना आणली आहे, मात्र या योजनेच्या नावाखाली ५००० हजारांहून अधिक शाळा बंद करण्याचा आदेश देऊन सर्व जिल्हा परिषद शाळा उद्योग समुह (कॉर्पोरेट) कंपन्यांना चालविण्यास देण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयामुळे शासकीय शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठी हानी होणार असून गरीब आणि शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका भविष्यात निर्माण होऊ शकतो तसेच खाजगी संस्थांच्या दबावाखाली शासकीय शाळांमधील शिक्षकांना काम करावे लागेल. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊन शिक्षणव्यवस्था धोक्यात येऊन खाजगी संस्थांच्या ताब्यात जाईल, शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी आणलेल्या या दत्तक योजनेवर विविध स्तरातून तीव्र विरोध होत असून शेकडो पालक आणि विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी शालेय शिक्षण विभागाला पत्र लिहून आपल्या प्रतिक्रिया कळविल्या असतानाही कोणत्याही हरकती जनतेकडून न मागवता "दत्तक शाळा योजना" राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासन निर्णयाविरोधात शैक्षणिक, सामाजिक संघटना तीव्र विरोध करीत असून शेकडो पालक आणि विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी ५००० शाळा बंद करण्याचा आदेश व सर्व जिल्हा परिषद शाळा उद्योग समुह (कॉर्पोरेट) कंपन्यांना चालविण्यास देण्याचा आदेश रद्द करण्याबाबत पालक व शिक्षक संघटनांनी पत्र लिहून आपल्या प्रतिक्रिया कळविल्या असतानाही शालेय शिक्षण विभागाने दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दत्तक शाळा योजनेमुळे गोरगरीब व शेतकऱ्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, तसेच या योजनेची माहिती देताना माझी शाळा सुंदर शाळा कार्यक्रमाच्या पुरस्कार वितरणाच्या निमित्ताने या उद्योगपतींची नावे ही सरकारने पुढे आणली असून अद्यापपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हानिहाय किती शाळा दत्तक घेतल्या व या शाळांवरती पायाभूत सुविधा विकासासाठी उद्योग समुह, स्वयंसेवी संस्थांनी माहे मार्च, २०२४ अखेर किती निधी खर्च केलेला आहे तसेच मोठ्या उद्योजकांनी शहरातील जिल्हा परिषद तसेच विविध स्थानिक स्वराज संस्थांच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या हजारो शाळा एकाच बड्या उद्योजकाला देण्यात येत असल्याने या उद्योजकांनी शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या आणि मोठ्या जुन्या इमारती मोठ्या जागा असलेल्या सरकारी शाळा आपल्याला मिळाव्यात अशी मागणी केली हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाविरोधात शैक्षणिक, सामाजिक संघटना तसेच शेकडो पालक आणि विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी शालेय शिक्षण विभागाला दिलेल्या पत्रांची दखल घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी उद्योगपतींच्या माध्यमातून "दत्तक योजना" रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-१०-२०२५) :** (१) या योजनेमुळे कोणतीही शाळा बंद होणार नाही.
(२) देणगीदारास शाळांच्या व्यवस्थापन, प्रशासन, सनियंत्रण व प्रचलित कार्यपध्दतीत कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद संबंधित शासन निर्णयात आहे.
(३) या योजनेबाबतच्या गैरसमजूतीतून काही संघटना व नागरिकांनी या योजनेस विरोध दर्शविणारी निवेदने सादर केली आहेत.
(४) या योजनेंतर्गत कोणतीही शाळा अद्यापि दत्तक घेण्यात आलेली नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बार्टी, सारथी, महाज्योतीची स्वायतत्ता धोक्यात येत असल्याबाबत

**(१५) २३३८५ (१६-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अरुण लाड, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक १९७०८ ला दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी टीआरटीआय, अनुसुचित जाती व जमातींसाठी बार्टी, ओबीसींसाठी महाज्योती, मराठा, मराठा कुणबी समाजासाठी सारथी, खुल्या प्रवर्गातील दुर्बल घटकांसाठी अमृत अशा विविध संस्था कार्यरत असून, सदर संस्थांमार्फत त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने अधिछात्रवृत्ती, परदेशी उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, युपीएससी, बँकिंग, रेल्वे व इतर स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन अंगीकृत बार्टी, सारथी, महाज्योती आदी संस्थांकडून विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणासाठी निविदा प्रक्रिया राबवून खाजगी संस्थांची निवड करुन त्या त्या संस्था स्वायत्त असल्यामुळे त्यांचे पातळीवर निर्णय घेण्याची मुभा त्यांना होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याऐवजी आता समान धोरणाच्या धर्तीवर आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, बार्टी, सारथी तसेच महाज्योतीच्या विविध योजना व प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, टीआरटीआय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केल्यामुळे सदरहु संस्थांची स्वायत्तता धोक्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समिती स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देणाऱ्या ८ खाजगी संस्थांची निवड करणार असून त्यांच्याकडूनच प्रशिक्षण योजना राबविणे सर्वांना बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निर्णय संस्थेच्या स्वायत्ततेवर निर्बंध आणणारा असून या सर्व संस्था वेगवेगळया घटकातील विद्यार्थ्यांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करून स्थापन करण्यात आल्या आहेत त्यांची ध्येय धोरणे नियमावली, उद्दिष्टे भिन्न असून समान धोरणाची सबब देऊन उक्त रचना बदलली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील विविध समाज घटकांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन उभारण्यात आलेला बार्टी, सारथी तसेच महाज्योती यासारख्या संस्थांची स्वायत्तता कायम राखण्यासाठी सदरहू आखलेले धोरण रद्द करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०९-१०-२०२५) :** (१). होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.अपर मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व स्वायत्त संस्थांच्या प्रमुखांचा समावेश असलेली समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.
(५) हे खरे नाही.
सदर गठीत समिती मार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये एकूण १७६ नामवंत व गुणवत्तापूर्वक प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली आहे.
(६) महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय), पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच, भविष्यात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ अन्वये सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे.

सदर धोरणानुसार अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय स्तरावर समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमध्ये सर्व संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांचा समावेश आहे. समिती आवश्यकतेनुसार बैठका आयोजित करून धोरणामध्ये सुधारणा करत असते.

---

## शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(१६) २३५९९ (१६-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहू, फुले, आंबेडकर निवासी, अनुसुचित जाती आश्रमशाळांना २०% वेतन अनुदान देण्याबाबत आयुक्त स्तरावर आश्रमशाळांची तपासणी करण्यात आली असून त्यानुषंगाने शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने पात्र आश्रमशाळांना वेतनश्रेणीनुसार तातडीने वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (३०-०९-२०२५) :** (१) व (२) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांकडे दिनांक १३/०५/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मंत्री (सा.न्या.) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वि.जा.भ.ज. आश्रमशाळांच्या धर्तीवर वेतनश्रेणी किंवा केद्रीय आश्रमशाळांच्या धर्तीवर मानधन देण्याच्या अनुषंगाने सदर आश्रमशाळांची यु-डायस प्रणालीवरील माहिती तपासून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना कळविण्यात आले असून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील तालुकास्तरीय क्रीडा संकुले अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१७) २३७६२ (२०-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व जिल्ह्यांतील तालुक्याच्या ठिकाणी टप्याटप्याने क्रीडा संकुल उभारण्याबाबतची मान्यता शासनाने सन २००० मध्ये वा त्यादरम्यान दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, परंतु कोल्हापूर जिल्ह्यातील तालुका क्रीडा संकुले उभारणीस जवळपास २३ वर्षे इतका कालावधी उलटूनही सद्य:स्थितीत अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोल्हापूर जिल्ह्यातील अपूर्ण अवस्थेतेतील क्रीडा संकुलांची कामे पूर्ण होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१८-०९-२०२५) :** (१) शासन निर्णय दिनांक २६/०३/२००३ नुसार राज्यातील प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील १२ तालुक्यांसह विशेष बाब म्हणून हुपरी (हातकणंगले तालुका) व बाचणी (करवीर तालुका) या दोन ठिकाणांसह एकूण १४ तालुका क्रीडा संकुलांना शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार क्रीडा संकुले उभारण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) कोल्हापूर जिल्हातील एकूण १४ तालुका क्रीडा संकुलांपैकी ९ क्रीडा संकुलांकरीता निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच उर्वीरत ५ तालुका क्रीडा संकुलांचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमधील सहायक शिक्षकांच्या नियुक्तीसाठी टीईटी पात्रतेची अट शिथिल करण्याबाबत

**(१८) २३८२१ (२२-०७-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक संस्थांच्या शाळांमधील सहायक शिक्षकांच्या नियुक्तीसाठी सध्या टीईटी पात्रता लागू नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्तीसाठी टीईटी पात्रतेची अट शिथिल करावी याबाबत लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक ४ एप्रिल, २०२४ रोजी शासन निर्णय जारी करण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या संचमान्यतेच्या शासन निर्णयास कला, क्रीडा व कार्यानुभव अशा विषयांकरीता शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे. दीर्घ कालावधीनंतर ही पदे संचमान्यतेत समाविष्ट झाल्याने पवित्र पोर्टलमार्फत ती भरण्यास आता अडचण नाही. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमता चाचणी-२०२५ या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून शाळांच्या मागणीनुसार अशा विषयातील शिक्षकांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासण्यासाठी दरवाढ करण्याबाबत

**(१९) २४३३९ (२२-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासण्याकरीता प्रती उत्तरपत्रिका ३/३.५० रूपये आणि भाषा विषयाच्या उत्तरपत्रिकेला प्रती प्रशन पत्रिका ४/४.५० रूपये असा दर देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहावीपेक्षा बारावीच्या उत्तरपत्रिका तपासतांना १ रूपया अधिक दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शिक्षक संघटनांनी गत दहा वर्षापासून उत्तरपत्रिका तपासणीमध्ये किमान १० रुपये दरवाढ करण्याबाबत सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनेक शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणी करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करणेबाबत शिक्षक संघटनांकडून वेळोवेळी मागणी करण्यत येत होती. त्याअनुषगांने सदर मागणीचा विचार करुन इ. १० वी व इ. १२ वी परीक्षांच्या संदर्भात दिनांक १०/०१/२०२५ व दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या सहविचार सभेमध्ये उत्तरपत्रिका तपासणी मानधनात फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षांपासून वाढ करण्याबाबतचा निर्णय झालेला होता.त्यानुसार राज्यमंडळ पत्र क्रमांक त्यानुसार अन्वये क.रा.मं/लेखा-६/२४-२५/४९४ अन्वये दिनांक ०५/०२/२०२५ नुसार सर्व विभागीय मंडळांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर दरवाढीच्या निर्णयानुसार इ. १० वी चे उत्तरपत्रिका तपासणी दर रुपये ५/-वरुन रुपये ६.५०/- तसेच इ. १२ वी उत्तरपत्रिका तपासणी दर रुपये ६/- वरुन रुपये ७.५०/-असे वाढविण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणी करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करणेबाबत शिक्षक संघटनांकडून वेळोवेळी मागणी करण्यात येत होती. त्याअनुषगांने सदर मागणीचा विचार करुन इ. १० वी व इ. १२ वी परीक्षांच्या संदर्भात शिक्षक संघटनाच्या सभा घेण्यात आलेल्या आहेत. व त्यान्वये उत्तरपत्रीका तपासणीच्या दरात बदल करण्यात आले आहे.

(४) त्यानुसार राज्यमंडळ पत्र कमांक क.रा.मं/लेखा-६/२४-२५/४९४ अन्वये दिनांक ०५/०२/२०२५ नुसार सर्व विभागीय मंडळांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर दरवाढीच्या निर्णयानुसार इ. १० वी चे उत्तरपत्रिका तपासणी दर रुपये ५/-वरुन रुपये ६.५०/- तसेच इ. १२ वी उत्तरपत्रिका तपासणी दर रुपये ६/- वरुन रुपये ७.५०/-असे वाढविण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शिक्षकांच्या वेतनास  विलंब होत असल्याबाबत

**(२०) २४४४० (२५-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानित शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मागील ३ ते ४ महिन्यांपासून १ तारखेला वेतन बँकेत जमा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील अनुदानित शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वितरणास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर म्हणजेच महिन्याच्या १ तारखेला होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२८-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मार्च २०२५ च्या वेतनासाठी शिक्षण संचालनालयाकडून दिनांक ०७/०४/२०२५ रोजी अनुदान प्राप्त झाले होते. तद्नंतर तात्काळ देयके तयार करून अधिदान व लेखाधिकारी कार्यालयात सादर करून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन बँक खात्यामध्ये जमा करण्यात आले. मुंबईतील पश्चिम विभाग, उत्तर विभाग व दक्षिण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च, एप्रिल व मे महीन्यांचे वेतन अनुक्रमे ११ ते १६ एप्रिल २०२५, २ मे २०२५ व २ ते ५ जून २०२५ या कालावधीत अदा केले आहे. तसेच, शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून वेतन अनुदान प्राप्त झाल्यानंतर शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याबाबतची कार्यवाही विहीत मुदतीत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.